# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०७.०१.२०२५

<u>अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही</u> :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०६/०१/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,५००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

<u>दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही</u> :—

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०६/०१/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १०,०४,३००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

<u>अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही</u> :—

१. मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध दि ०६/०१/२०२५ पोस्टे हटटा जि हिंगोली येथे फिर्यादी सतिश माणिकराव ठेंगे वय ३३ वर्ष व्य.नौकरी पोउपनि ने.वि.पथक क्र.३ उपविभाग वसमत मो.नं.९०११६१६५६६ यांनी आरोपी नामे १)एम.एच.३० एल.३८४१ २)एम.एच.२७ बि.एक्स२२८९ ३)एम.एच.०६ बि.डी.७८८५ चे चालक नाव गाव माहिती नाही.कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता सहकलम ४८(७)(८) गौ.ख.अधि. **मि.माल** :— १)टाटा कंपणची लाल रंगाचे टिपर एम.एच.३० एल.३८४१ २) टाटा कंपणची लाल पांढऱ्या रंगाचेएम. एच.२७ बि.एक्स२२८९ ३) टाटा कंपणची लाल पांढऱ्याएम.एच.०६ बि.डी.७८८५ असा एकुण ४५,२०,००० रू मुद्देमाल नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील तिन टिपर चालक नाव गाव माहिती नाही हे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करण्याच्या उद्देशाने नदीपात्रात दिसुन आले असतांना सदर वाहनांचे चालक पोलीसांना पाहुन टिपर जागीच सोडुन पळनु गेले म्हणुन गुन्हा.

<u>सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अंतर्गत विक्रत्यावर कार्यवाही</u> :—

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्य दि.०६/०१/२०२५ रोजी सिगारेट आणि अन्य तंबाखुजण्य उत्पन्नाची जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार वानिज्य उत्पादन पुरवठा व वितरण याचा कायदा २००३ अन्वये हिंगोली जिल्हा येथे एकुण ०२ ठिकाणी कलम ६,२४ अन्वये गुन्हे दाखल झाला असुन एकुण मिळालेला माल ९३०/— रू यातील आरोपीने स्वत:चे फायदयाकरीता चालविलेल्या पानटपरी मध्ये महाराष्ट्र शासनाने विशिष्ट क्षेत्रातमध्ये प्रतिबंधीत केलेला तंबाखु जन्य वस्तु व सिगारेट/बिडी जन्य पदार्थ साठवुन वितरीत करत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा.